# 'चार्टर्ड अकाऊंटंट' क्षेत्रात शीला गावणेकर यांची भरारी



## गोव्यातील पहिल्या कर्तबगार सीए; महिलांसमोर ठेवला आदर्श



हेमा नायक

**गोव्यातील कर्तृत्वान आणि महत्त्वाकांक्षी शीला गावणेकर या सीए झालेल्या गोव्यातील पहिल्या कर्तबगार महिला आहेत. त्याहूनही जास्त भूषणावह बाब म्हणजे या क्षेत्रात देशात त्यांचा चौथा क्रमांक लागतो. सीएच्या परीक्षेत तर पहिल्याच प्रयत्नात त्या उत्तम गुणांनी सफल झाल्या. त्यांची हुशारी, बुद्धीमत्ता, तेज, उत्साह, चैतन्य सगळेच अनन्यसाधारण! त्यांचा जीवनप्रवास अनेक महिलांसाठी प्रेरणादायी आहे. नवरात्रीच्या निमित्ताने याच प्रेरणादायी जीवन प्रवासावर लेखिका हेमा नायक यांनी टाकलेला प्रकाश...**

**स्त्री कधीच दुर्बळ नव्हती. ती** सर्वशक्तिमान तर होतीच, जोडीला बुद्धिमत्ताही होती. तरीदेखील सर्व गुणांची वाढ होण्यासाठी ज्या शिक्षणाची गरज होती, ते शिक्षण तिच्या पदरी पडण्यास बराच वेळ गेला. गोवा मुक्तीनंतर तिला जेव्हा ही वाट सापडली, तेव्हा तिने मागे वळून बघितले नाही. ध्येय, निष्ठा, चिकाटी पणाला लावून आपल्या क्षेत्रात रमत गेली. तिला हवा होता आत्मसन्मान आणि तो मिळण्यासाठी तिला स्वयंभू होणे गरजेचे होते. तिला याचे गमक जेव्हा सापडले तेव्हा प्रबळ इच्छाशक्तीने तिला साथ दिली.

**तारुण्यात गवसला यशाचा मार्ग**



दैदीप्यमान स्त्रियांची अवघीच नावे डोळ्यासमोर झळकत असली, तरी उच्चस्तरावर पोहोचण्यासाठी त्यांनी घेतलेले खडतर परिश्रम आणि अवलंबिलेला कणखरपणा आमच्यासाठी एक आदर्श ठरला. समाजाच्या परिवर्तनाची दिशा अशीच असते. अशाच व्यक्ती समाजाची स्थितप्रज्ञता मोडू शकतात. यशाची पायरी कशी चढायची, त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे ऐन तरुणपणी गोव्यात येऊन मडगावी स्थायिक झालेल्या आणि चार्टर्ड अकाऊंटन्ट म्हणून नावलौकीक मिळवलेल्या शीला हिरबा गावणेकर यांचे.

### पतीच्या निधनानंतर व्यवसायात घेतले गुंतवून

- पेशाने वकील असलेल्या (स्व.) हिरबा गावणेकर यांच्याशी त्यांची दोस्ती झाली. एकदम मनमिळावू स्वभावामुळे त्यांनी लग्नाची गाठ बांधली. एकामेकांच्या सहकार्याने त्यांचा संसार छान चालला. दोन समविचारांची बुद्धीवान, कष्टाळू आणि ध्येयनिष्ठ माणसे होती ती.
- अचानक त्यांच्या पतीच्या अकाली निधनाने त्यांच्या खंबीरपणाला एकदम तडा गेला. त्यातूनही त्यांनी स्वतःला सावरून घेतले आणि व्यवसायात गुंतवून घेतले. आज मडगावात त्यांचे स्वतःचे इन्कमटॅक्स अँड कन्सलटेशन्सचे सुसज्ज ऑफीस आहे. बँका आणि मोठमोठ्या कंपन्यांची कामे त्यांना भरपूर मिळतात. क्लायंटची त्यांना पसंती असते.

**आईच्या प्रेरणेने घेतले उच्च शिक्षण**

शीला गावणेकर या मूळच्या कारवार येथील. तिथेच त्यांचे शालेय शिक्षण पूर्ण झाले. लहानपणापासून त्यांचे लक्ष कॉमर्स म्हणजे वाणिज्य यासारख्या कठीण आणि क्लिष्ट विषयाकडे गेले. त्यांची आई समाजकार्यकर्त्या. यात मातृशक्तीच्या प्रेरणेने उच्च शिक्षणासाठी त्या मुंबईला गेल्या. तिथे जाऊन बी.ए. ऑनर्स, बी.कॉम. एफ.सी.ए., एल.एल.बी. अशा कित्येक पदव्या मिळविल्या. अखेर त्यांनी चार्टर्ड अकाऊंटन्सी हा आपल्या आवडीचा व्यवसाय स्वीकारला.

**गोव्याच्या वातावरणाशी झाल्या एकरूप**

गोव्यात जुळवून घेण्यात त्यांना प्रथम बरेच त्रास झाले असतील. कारण त्या काळात अशा अनोळखी ठिकाणाशी, येथील व्यक्तींशी जुळवून घेणे कठीण होत होते. तरीही शिक्षणक्षेत्रात त्यांचे व्यक्तिमत्त्व एवढे जबरदस्त होते की, त्यांच्या संभाषणाला (पान ७ वर)

# गोव्याने साकारला रोमहर्षक विजय

## २५ वर्षांखालील क्रिकेट : कश्यप, मंथनची धडाकेबाज अर्धशतके; ६ विकेट राखून बाजी

पणजी, ता. २३ (क्रीडा प्रतिनिधी) : गोव्याने २५ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत मंगळवारी पुदुचेरी येथे रोमहर्षक विजय साकारला. शेवटच्या चेंडूवर विजयी ठरलेला अवांतर चौकार मिळाल्यामुळे त्यांनी हरियानास ६ विकेट राखून हरविले. पावसामुळे एकदिवसीय सामना प्रत्येकी २० षटकांचा खेळविण्यात आला.


मंथन खुटकर


कश्यप बखले

### दृष्टिक्षेपात...

- मंथन खुटकरच्या ४९ चेंडूंत २ चौकार, ५ षटकारांसह ६७ धावा
- कश्यप बखलेच्या ४७ चेंडूंत ६ चौकार, ४ षटकारांसह ७७ धावा
- गोव्याचे एकूण ११, तर हरियानाचे १३ षटकार
- हरियानाच्या व्ही. ए. भारद्वाज याच्या ६५ चेंडूंत ७ चौकार, ९ षटकारांसह नाबाद १०८ धावा
- गोव्याचे २ लढतीनंतर ६ गुण, पुढील सामना बुधवारी (ता. २४) दिल्लीविरुद्ध

सलामीचा मंथन खुटकर आणि कश्यप बखले यांनी धडाकेबाज आक्रमक फलंदाजी करताना केलेली १३२ धावांची भागीदारी गोव्याच्या विजयात निर्णायक ठरली. मंथनने ६७, तर कश्यपने ७७ धावा केल्या. सलामीचा वैभव गोवेकर संघाची धावसंख्या पाच असताना जायबंदी झाल्याने माघारी परतला. नंतर कश्यप व मंथन जोडी एकत्र आली आणि त्यांनी हरियानाच्या गोलंदाजांवर तुफानी हल्ला चढवत संघाला भक्कम पायाभरणी करून दिली.

गोव्यासमोर विजयासाठी १८५ धावांचे आव्हान होते. विसाव्या षटकांतील शेवटच्या चेंडूवर ४ विकेट विकेट गमावून गोव्याने लक्ष्य गाठले. प्रथम फलंदाजीचे आमंत्रण मिळाल्यानंतर सलामीच्या व्ही. ए. भारद्वाज (१०८) याच्या झंझावाती नाबाद शतकामुळे हरियानाने ४ बाद १८४ धावा केल्या होत्या.

गोव्याला शेवटच्या दोन षटकांत विजयासाठी २१ धावांची गरज होती. नंतर आठ चेंडूंत १६ धावांची आवश्यकता असताना जम बसलेला कश्यप बाद झाला, त्यानंतर निहाल सुर्लकर व आलम खान यांनी आक्रमकता जोपासत गोव्याचा संघ ढेपाळणार नाही याची दक्षता घेतली. विजयी आव्हानाचा पाठलाग करताना गोव्याने पंधराव्या षटकापासून ३२ धावांत ४ विकेट गमावल्या. मंथन, कर्णधार सुयश प्रभुदेसाई, संकेत मोरजकर व कश्यप बाद झाल्यामुळे गोव्याची बिनबाद १३७ वरून ४ बाद १६९ अशी स्थिती झाली. सुयश सोळाव्या षटकात धावबाद झाल्याने गोव्याला धक्का बसला, पण नंतर फलंदाजांनी धावगतीकडे लक्ष ठेवत फलंदाजी केली.

### संक्षिप्त धावफलक

हरियाना : २० षटकांत ४ बाद १८४ (व्ही. ए. भारद्वाज नाबाद १०८, हेरंब परब ४-०-४४-१, निहाल सुर्लकर ४-०-३२-०, सुयश प्रभुदेसाई ४-०-४५-१, वेदांत नाईक ४-०-३४-०, धीरज यादव ४-०-२९-२) पराभूत वि. गोवा : २० षटकांत ४ बाद १८५ (वैभव गोवेकर जखमी निवृत्त १, मंथन खुटकर ६७, कश्यप बखले ७७, सुयश प्रभुदेसाई ५, संकेत मोरजकर ९, निहाल सुर्लकर नाबाद ९, आलम खान नाबाद ९, अंशुल कंबोज १-३०, जे. ए. भांभू १-३८, लक्ष्यसुमन दलाल १-३८).

V. M. S. Shree Damodar College of Com...
MARGAO-GOA
* LIBRARY *

THE NAVHIND TIMES
SUNDAY December 26, 2021

# Damodar college gets NAAC 'A' grade

**NT NETWORK**
*Margao*

VVM's Shree Damodar College of Commerce and Economics and Research Centre, Margao has been awarded 'A' grade by the National Assessment and Accreditation Council (NAAC), Bengaluru.

The institute secured a score of 3.03 out of 7. The institute was assessed for the fourth cycle of accreditation, and with its latest accreditation, it has now joined only 64 colleges across India to be accredited in the fourth cycle.




Principal of VVM's Shree Damodar College of Commerce and Economics Dr. Prita D. Mallya seen receiving NAAC certificate.

The NAAC peer team visited the college on November 25 and 26. The peer team included chairperson Vice Chancellor Dr Murlidhar Chandekar, member co-ordinator Dr. Venkata Krishna Parimala and member Dr. Indrila Guha.

Vidya Vikas Mandal's Shree Damodar College of Commerce & Economics was established in 1973. It is the first of five institutions set up by Vidya Vikas Mandal, a charitable society that is currently in its Golden Jubilee Year.

The vision of the college is to be a torch-bearer imparting total quality education and it is striving tirelessly towards achieving this vision.

The college currently offers five undergraduate and two postgraduate programmes and also has a research centre in management studies and is a part of research clusters in commerce and economics.

MARGAO-GOA
LIBRARY

तरुण भारत

शुक्रवार, ७ जानेवारी २०२२

# मडगावच्या दामोदर कॉलेजला 'अ' श्रेणी



मडगाव : विद्या विकास मंडळाच्या श्री दामोदर कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड एएमपी, अर्थशास्त्र आणि संशोधन केंद्राला नॅशनल असेसमेंट अॅन्ड अॅक्रिडिटेशन कौन्सिल (नॅक) चा 'अ' श्रेणीचा दर्जा डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्याकडून स्वीकारताना प्राचार्य डॉ. प्रीता मल्या. सोबत इतर मान्यवर.

प्रतिनिधी
मडगाव

मडगावच्या विद्या विकास मंडळाच्या श्री दामोदर कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड एएमपी, अर्थशास्त्र आणि संशोधन केंद्राला नॅशनल असेसमेंट अॅन्ड अॅक्रिडिटेशन कौन्सिल (नॅक) बेंगळुरू यांनी 'अ' श्रेणीचा दर्जा दिला आहे. दामोदर कॉलेजला ७ पैकी ३.०३ गुण मिळाले आहेत.

कॉलेजचे चौथ्या आवर्तनासाठी मूल्यांकन करण्यात आले आहे आणि यासह, ती आता भारत भरातील केवळ ६४ महाविद्यालयांमध्ये चौथ्या चक्रात मान्यता प्राप्त होण्यासाठी सामील झाली आहे. नॅशनल असेसमेंट अॅन्ड अॅक्रिडिटेशन कौन्सिल पीअर टीमने २५ आणि २६ नोव्हेंबर रोजी कॉलेजला भेट दिली.

ऑन साईट व्हिजिट केलेल्या पीअर टीममध्ये अध्यक्ष : डॉ. मुरलीधर चांदेकर (कुलगुरू), सदस्य समन्वयक : डॉ. व्यंकट कृष्णा परिमला (प्राध्यापक), सदस्य : डॉ. इंद्रिला गुहा (प्राचार्य) यांचा समावेश होता.

श्री दामोदर कॉलेज ऑफ कॉमर्सची स्थापना विद्या विकास मंडळ या धर्मादाय संस्थेने केली. विद्या विकास मंडळाच्या पाच संस्थांपैकी पहिली संस्था म्हणून १९७३ मध्ये अर्थशास्त्र महाविद्यालयाची स्थापना केली. संपूर्ण दर्जेदार शिक्षण देणे हे या महाविद्यालयाचे वैशिष्ट्य आहे. हे महाविद्यालय ५ अंडरग्रेजुएट आणि २ पोस्ट ग्रॅज्युएट प्रोग्राम ऑफर करते, मॅनेजमेंट स्टडीजमध्ये संशोधन केंद्र आहे आणि कॉमर्स आणि इकॉनॉमिक्समधील संशोधन क्लस्टरचा भाग आहे. क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्टतेसाठी महाविद्यालयाची चांगली प्रतिष्ठा आहे आणि २०१७-१८ मध्ये, महाविद्यालयाने सर्वोत्कृष्ट क्रीडा महाविद्यालय (पुरुष) साठी गोवा विद्यापीठ पुरस्कार जिंकला.

पीअर टीमने लक्षात घेतलेल्या संस्थात्मक संदर्भातील प्रमुख वैशिष्ट्ये अशी आहेत : अभ्यासक्रमांची रचना चांगली आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो, आयटी पायाभूत सुविधा चांगली आहे, प्राध्यापकांची भरती १०० टक्के आहे.

Shree Damodar College of C...
MARGAO-GOA

THE NAVHIND TIMES
FRIDAY February 4, 2022

# Book exhibition-cum-sale held at Shree Damodar College, Margao

**NT KURIOCITY**

The Department of Library and Information Science in association with the Readers' Club of VVM's Shree Damodar College of Commerce and Economics, Margao organised a book exhibition-cum-sale at the Library Reading Room. The programme was held in adherence to COVID-19 safety protocols.

The book exhibition was inaugurated at the hands of the college principal, Prita D Mallya.

Navkar Book Distributors from Mumbai displayed a wide range of books in subjects such as commerce, economics, mathematics, environment, agriculture, law, banking, literature, research methodology, sports, fitness, yoga, fiction, and more. Competitive exam reference books were also on display. The book exhibition-cum-sale was visited by about 75 staff members of the college and sister institutes, Vidya Vikas Academy and RMS Higher Secondary School.

Shree Damodar College of Com...
MARGAO-GOA
LIBRARY

# साळगावकर टी-१० क्रिकेटचे दामोदर कॉलेज चॅम्पियन

## ताळगाव पठारावरील मैदानावर सामन्यांचे आयोजन; मोहित रेडकर, मंथन खुटकर बनले सामनावीरांचे मानकरी



**ताळगावः साळगावकर कायदा कॉलेजने आयोजित केलेल्या व्ही. एम. साळगावकर स्मृती टी-१० क्रिकेट स्पर्धेत जेतेपद मिळविलेला मडगावचा दामोदर कॉलेजचा संघ सगुण कामत, डॉ. सहदेव मांद्रेकर, अनिल डिंगे, प्रा. डॉ. राधिका नायक यांच्या समवेत. अंतिम सामन्यात सामनावीर मोहित रेडकर आणि उपांत्य सामन्यातील सामनावीर मंथन खुटकर.**

क्रीडा प्रतिनिधी
मडगाव

अंतिम सामन्यात धेंपो कॉलेजचा ६ विकेट्सनी पराभव करून मडगावच्या दामोदर कॉलेजने मिरामारच्या साळगावकर कायदा महाविद्यालयाच्या फिजिकल एज्युकेशन विभागाने आयोजित केलेली व्ही. एम. साळगावकर स्मृती अखिल गोवा पातळीवरील आंतर कॉलेज टी-१० लेदरबॉल क्रिकेट स्पर्धा जिंकली.

या स्पर्धेचे आयोजन गोवा विद्यापीठाच्या ताळगाव पठारावरील मैदानावर झाले. अंतिम लढतीत प्रथम फलंदाजी करताना धेंपो कॉलेजने निर्धारीत १० षटकात ७० धावा केल्या. दामोदर कॉलेजने ४ बाद ७१ धावा करून सहज विजय नोंदविला. या सामन्यात २ विकेट्स आणि नाबाद २६ धावा केलेल्या मोहित रेडकरची अंतिम सामन्यातील सामनावीर म्हणून निवड झाली.

त्यापूर्वी झालेल्या पहिल्या उपांत्य लढतीत धेंपो कॉलेजने फोंड्याच्या जीव्हीएम्स कॉलेजचा ११ धावांनी पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश मिळविला होता. धेंपो कॉलेजने प्रथम फलंदाजी करताना निर्धारीत १० षटकात ८ बाद ९७ धावा केल्या व नंतर जीव्हीएम्स कॉलेजला निर्धारीत षटकात ५ बाद ८६ धावांत रोखले. दुसऱ्या उपांत्य लढतीत सामनावीर मंथन खुटकरने ठोकलेल्या ७१ धावांच्या बळावर दामोदर कॉलेजने पेडणे सरकारी कॉलेजचा ३४ धावांनी पराभव केला आणि अंतिम फेरीत प्रवेश मिळविला. दामोदर कॉलेजने प्रथम फलंदाजी करताना निर्धारीत १० षटकात २ बाद ११९ धावा केल्या व नंतर पेडणे सरकारी कॉलेजला १० षटकात ७ बाद ८५ धावांत रोखले.

विजेत्या दामोदर कॉलेजला रोख १५,००० व साळगावकर चषक, उपविजेत्या धेंपो कॉलेजला रोख १०,००० व चषक प्राप्त झाले. धेंपो कॉलेजच्या आनंद तेंडुलकरची स्पर्धावीर, दामोदर कॉलेजच्या शुभम गजीनकरची उत्कृष्ट गोलंदाज तर युवाराज पालकरची उत्कृष्ट फलंदाज पुरस्कारासाठी निवड झाली.

स्पर्धेचे उद्घाटन धारबांदोडा मल्टिफॅक्यूल्टी कॉलेजचे प्राचार्य डॉ. शेख मोहम्मद परवेज अल उस्मानी यांच्या हस्ते झाले. यावेळी साळगावकर कायदा कॉलेजचे प्राचार्य डॉ. शबीर अली जी., प्रशासक ज्ञानेश्वर पेडणेकर यांची उपस्थिती होती. बक्षीस वितरण गोवा रणजी क्रिकेट संघाचा माजी कप्तान सगुण कामतच्या हस्ते झाले. यावेळी पीईएस कॉलेजचे माजी प्राचार्य आणि साळगावकर कायदा कॉलेजच्या व्यवस्थापकीय मंडळातील सदस्य डॉ. अनिल डिंगे, धेंपो कॉलेजच्या प्राचार्या डॉ. राधिका नायक, कॉलेजचे क्रीडा संचालक डॉ. सहदेव मांजरेकर यांची उपस्थिती होती.

क्रीडा इन्स्ट्रक्टर लवू गोवेकर आणि क्रीडा सचिव करिना शिरोडकर यांनी ही स्पर्धा यशस्वी करण्यास क्रीडा मंडळाच्या सहाय्याने विशेष परिश्रम घेतले. सांस्कृतिक मंडळाच्या सचिव अनुष्का झावरे व दुर्वा पेडणेकर हिने सूत्रसंचालन केले. जनरल सेक्रेटरी निशीकर राऊत देसाई यांनी आभार मानले.

M.S. Shree Damodar College of Com. &
MARGAO-GOA

THE GOAN
EVERYDAY

Tuesday April 19, 2022

# Margao fire brigade holds demonstration, awareness camp



Fire officials guide the staff of Damodar College and Kare College of law in extinguishing fires with the extinguishers.
Santosh Mirajkar

**THE GOAN | NETWORK**

**MARGAO**

The Margao Fire brigade on Monday held a demonstration cum awareness camp for the staff of the Damodar College of Commerce and Govind Ramnath Kare College of law in handling fire extinguishers in times of emergencies.

Margao Fire Officer Gill de Sa explained to the participants how to operate the fire extinguishers in emergency situations. He later held a demonstration outside the building by giving tips to the College staff on using the fire extinguishers.

Gill told the media that he explained to the college staff what they should do when a fire breaks out. "We have explained how the staff can help in bringing the fire under control or to stop the spread of the fire in the building by using the fire extinguishers installed in the building", he added.

V.V.M.'s Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
★ LIBRARY ★

गोमन्तक
www.dainikgomantak.com
पणजी, गुरुवार, २३ जून २०२२ | १५

# दामोदर कॉलेजचा वर्धापनदिन उत्साहात

**पणजी, ता. २२ (प्रतिनिधी):** मडगाव येथील दामोदर वाणिज्य महाविद्यालयाने १७ जून रोजी आपल्या सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण केले. यानिमित्त विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष आणि खजिनदार यांनी महाविद्यालयाचे शिक्षक, कर्मचारी यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला.

प्राचार्य प्रीता डी. मल्ल्या यांनी विद्या विकास मंडळाचे पदाधिकारी आणि महाविद्यालयाचे कर्मचारी यांचे स्वागत केले. यावेळी आपल्या भाषणात मल्या यांनी सांगितले, की हा प्रसंग ऐतिहासिक असल्याचे नमूद केले. विद्या विकास मंडळाचे संस्थापक सदस्य उत्तम एन. बेने हे याप्रसंगी आपल्यासमवेत आहेत हे आपले भाग्य असल्याचे त्या म्हणाल्या. या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी नितीन कुंकळकर यांच्या उपस्थितीचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

यावेळी नितीन कुंकळकर यांनी आपल्या भाषणात सर्व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना त्यांची कारकीर्द घडविण्यासाठी तयार करा, असे आवाहन त्यांनी शिक्षकांना केले.

मधुकर मल्ल्या यांनी आपल्या भाषणात तंत्रज्ञान जगात बदल घडवित आहे, याकडे लक्ष वेधले. विद्या विकास मंडळाचे खजिनदार यू. एन. बेने यांनी महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवाच्या लोगोचे अनावरण केले. तसेच त्यांनी संस्थेच्या नव्या लेटरहेडचे प्रकाशन केले. डॉ. शीतल आरोंदेकर, स्वाती भट, आश्विनी देवारी आणि रमा बोरकर यांनी सादर केलेल्या सरस्वती वंदनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

V.V.M.'s Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
★ LIBRARY ★

गोमन्तक
www.dainikgomantak.com
पणजी, गुरुवार, ७ जुलै २०२२

# दामोदर महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण

**पणजी, ता. ६ (प्रतिनिधी) :** विद्या विकास मंडळाच्या श्री दामोदर वाणिज्य महाविद्यालयाचा वार्षिक बक्षीस वितरण समारंभ ३० जून रोजी उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दक्षता खात्याचे संचालक मायकल डिसोझा उपस्थित होते.

व्यासपीठावर महाविद्यालयाच्या प्रशासकीय कौन्सिलचे चेअरमन यू. एन. बेने, शीला गावणेकर आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी प्राचार्य प्रीता डी. मल्ल्या यांनी स्वागत केले. बक्षीस विजेत्यांचे त्यांनी अभिनंदन केले. विद्यार्थी मंडळाच सरचिटणीस गौरीश भाटीकर, सांस्कृतिक मंडळाचे सरचिटणीस जॅक्सन रॉड्रिग्स व क्रीडा मंडळाचे सरचिटणीस क्रेसजोवेल परेरा यांनी आपापल्या विभागांचे अहवाल सादर केले. प्राचार्य मल्ल्या यांनी आपला अहवाल सादर केला.

प्रमुख पाहुणे मायकल डिसोझा यांनी आपल्या भाषणात संस्थेचे संस्थापक सदस्य बेने व शीला गावणेकर यांची त्यांच्या कार्याबद्दल प्रशंसा केली.




**मडगाव : दामोदर महाविद्यालयात पारितोषिक वितरणप्रसंगी शीला गावणेकर, मायकल डिसोझा, प्रीता मल्ल्या व इतर.**

महाविद्यालयाच्या विद्यार्थी मंडळाने राबविलेल्या जॉय ऑफ गिव्हिंग या देणगीविषयक मोहीमेचे यावेळी करण्यात आलेले सादरीकरण हे या कार्यक्रमाचे एक वैशिष्ट्य ठरले. डॉ. लीरा एम. गामा यांच्या मार्गदर्शनाखाली या मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेद्वारे संकलीत झालेला निधी चांदर येथील वृध्दाश्रम आणि काणकोणच्या लोकविश्वास प्रतिष्ठानच्या विशेष विद्यालयाला आवश्यक असलेल्या वस्तू खरेदीसाठी देण्यात आला.

विद्यार्थ्यांनी शैक्षणिक, क्रीडा, एनसीसी, एनएसएस, सांस्कृतिक क्षेत्रात बजावलेल्या कामगिरीबद्दल चषक, प्रमाणपत्रे यांचे मान्यवरांतर्फे वितरण करण्यात आले. दामोदर रत्न पुरस्कार प्रेम कुमार यांना व बी. कॉम. विद्यार्थी म्हणून रोशनी खातून यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. तृतीय वर्ष बी.कॉम.मधील सर्वात अभ्यासू महिला म्हणून ईलेन कुरैय्या यांना पुरस्कार देण्यात आला. प्रथमेश देसाई याला अष्टपैलू विद्यार्थी म्हणून पुरस्कार देण्यात आला. उपप्राचार्य डॉ. रॉडनी डिसिल्वा यांनी आभार मानले.

V.V.M.S. Shree Damodar College of Com. & Eco.
MARGAO-GOA
★ LIBRARY ★